NAVSHAKTI, SATURDAY, JULY 29, 2017

# ...शासनाकडे दुर्लक्ष; ...ले – जयंत पाटील

नियुक्ती ...ऱ्यांसह ... महिला ...त यांनी ... गोष्टींची ... दोषींवर ... कैद्यांचे ... हिलांना ... ळीद- ... नाही. ... नाही. ... लणार? ... कैद्यांनी ... महिला ... रुंगातून ... आहे. हे ... गणीही ... ष्ट्रवादी ... की, ... लांवर

लैंगिक अत्याचार होत असतात. माझ्याकडे याचे पुरावे आहेत. हवे असल्यास आपणाकडे देतो. कारागृहात पुरुष अधिकाऱ्यांकडून महिलांना चुकीची वागणूक मिळते. असे अनेक प्रकार राज्यात घडत आहेत, हे मी पुराव्यानिशी सांगू शकतो. सरकारने एखाद्या महिला वरिष्ठ अधिकाऱ्याकडून या प्रकरणांची चौकशी करावी. मंजुळा शेट्ये प्रकरणातील अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी इतर कर्मचारी प्रयत्न करत आहेत. त्यांच्यावर सरकारने कारवाई करावी अशी मागणी अजित पवार यांनी केली.

या लक्षवेधीवर उत्तर देताना रणजित पाटील म्हणाले की, अजितदादांनी सांगितलेल्या सर्वच गंभीर प्रकारांची सविस्तर चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाईल. मंजूळा शेट्येला मारहाण झालेली आहे. १७ ठिकाणी जखमा झाल्या आहेत. तिच्या मत्यूबद्दल कोर्टात सादर केलेल्या पत्रात खोटी माहिती दिल्याबद्दल त्या डॉक्टरांना निलंबित करण्यात येईल.

# ...नेवाळीतील शेतकऱ्यांच्या जमिनीप्रकरणी लवकरच तोडगा काढू – चंद्रकांत पाटील

मुंबई, शुक्रवार (प्रतिनिधी) – नेवाळी येथील शेतकऱ्यांच्या जमिनींबाबत शुक्रवारी विधानसभेत पडसाद उमटले. सदर प्रकरण केंद्र सरकारच्या अख्यारित येत असल्याने केंद्रीय संरक्षण मंत्री सुभाष भामरे यांच्यासोबत लवकरच मंत्रालयात एक विशेष बैठक घेऊन शेतजमिनीबाबत तोडगा काढू, असे स्पष्टीकरण सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी विधानसभेत दिले. आमदार संजय दत्त, अशोक उर्फ भाई जगताप, रामहरी रुपनवर आदींनी यामुद्द्याबाबत लक्षवेधी मांडून सभागृहाचे लक्ष वेधले.

कल्याण येथील नेवाळी विमानतळासाठी शासनाने नेवाळी, भाल, डावलपाडा या भागातील सुमारे १७ गावांमधील शेतकऱ्यांच्या १६७६ एकर जमिनी जबरदस्तीने घेतल्या आहेत. शेतकऱ्यांनी याविरोधात उग्र आंदोलनाचे हत्यार उपसले. पोलिसांनी यावेळी केलेल्या गोळीबारात सुमारे ११ आंदोलक व पाच पोलीस जखमी झाले. याप्रकरणी अनेक आंदोलकांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले. शेतकऱ्यांच्या जमिनी हुसकावून घेतल्या जात आहेत. या शेतकऱ्यांना न्याय मिळायला हवा. अनेकांवर झालेले गुन्हे मागे घेण्यात यावेत, शेतजमिनीची नेमकी प्रोव्हिजन काय, असे विविध प्रश्न विरोधकांनी उपस्थित केले. तसेच अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट असूनही त्यावर बांधकामे कशी केली जातात, असा सवाल विचारत नेवाळी जमिनप्रकरणी निर्णय होत नाही, तोपर्यंत त्यांच्यावर कोणतीही कारवाई करु नका, त्यांना पर्यायी उपलब्ध करुन द्या, अशी मागणी केली.

सन १९४२ साली विमाने उतरण्यासाठी १८६९ एकर जमीन तात्पुरत्या स्वरुपात येथील शेतकऱ्यांकडून ४ लाख ७८ हजार १०७ रुपये देऊन विकत घेण्यात आली होती. १९८१ मध्ये हवाई दलाने ही जागा नौदलाला हस्तांतरीत केली. सात बारा उताऱ्यावर तशी नोंद झाली. परंतु, नौदलाने या जागेकडे दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांनी यावर पिके आणि अनधिकृतपणे बांधकामे केली. दरम्यान, २०१५ मध्ये नौदलाने जागांची मोजणी करण्यास सुरुवात केल्यावर सदर जागेवरुन वाद सुरु झाला. आंदोलनकर्त्यांनी याप्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे हिंसाच्या उद्देशाने शेतकऱ्यांनी आंदोलन करु नयेत. केंद्र सरकारकडे या विषयावर राज्य सरकार लवकरच बैठक घेईल, असे आश्वासन बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत दिले.

# पिंजाळ व दमणगंगा जोडनदीसाठी साडेचार हजार कोटीची आवश्यकता – महाजन

**विशेष प्रतिनिधी**

मुंबई, शुक्रवार – दमणगंगा व पिंजाळ या नदीजोड प्रकल्पासाठी ४५०० कोटी खर्च येणार असल्याची माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांनी आज दिली. काल नवी दिल्ली येथे विज्ञान भवनात या नदीजोड प्रकल्पातील १३ व्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत केंद्रीय जल संपदा राज्यमंत्री व विविध राज्याचे अधिकारी उपस्थित होते.

या संदर्भात विधानभवनात बोलताना महाजन म्हणाले की, दमणगंगा व पिंजाळ हा नदीजोड प्रकल्प लवकरात लवकर सुरू व्हावा यासाठी राज्य सरकारने २९ जुलैला श्वेतपत्रिका काढली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दमणगंगा व पिंजाळ नदीचे खोऱ्याला लागूनच पार-तापी-नर्मदा खोरे आहे. या पाच नद्या एकत्र करण्याचा प्रयत्न सुरू होत आहे.

# ...भरून काढावी – नितेश राणे

...ांच्या तक्रारी आहेत. त्याची ...ल्पना मुख्याधिकाऱ्यांना दिली. ...तु त्यांच्याकडून वेळ दिला ...त नाही. तसेच नगरविकास ...यांनाही त्या अधिकाऱ्यांकडून ...कीची माहिती देवून काम पुढे ...ण्याचा आरोप करत ...ठिकाणी चुकीचे काही घडले ...त्याची जबाबदारी संपूर्णत: ...यांना जबाबदार धरण्यात येणार ...ल्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

नगरपंचायतींच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे सांगून ते पुढे म्हणाले की, निवडणूका जिंकून फक्त स्वस्त बसता येणार नाही. तर तेथील नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी नगरपंचायतीच्याही समस्या सोडवाव्या लागणार आहेत.


**युनियन बँक ऑफ इंडिया**

मुख्य कार्यालय: २३९, विधान भवन मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.

**सूचना**

सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन २९ सहवाचता रेग्युलेशन ४७ अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, बँकेच्या संचालक मंडळाची सभा दिनांक ३० जून, २०१७ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता बँकेच्या अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांना इतर बाबींसह विचारात आणि पटलावर घेण्यासाठी गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी घेण्यात येणार आहे.

सदर सूचना बँकेचे संकेतस्थळ म्हणजेच **www.unionbankofindia.co.in** आणि स्टॉक एक्सचेंजेसचे संकेतस्थळ म्हणजेच **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** वरही उपलब्ध आहे.

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** २९ जुलै, २०१७

**युनियन बँक ऑफ इंडियाकरिता**
कंपनी सचिव



**TATA**

**TATA STEEL LIMITED**

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street,
Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

टाटा स्टील लिमिटेड ('कंपनी')च्या संचालक मंडळाची सभा दिनांक ३० जून, २०१७ रोजी संपलेल्या तिमाहीकरिताच्या लेखापरिक्षित अलिप्त आणि अलेखापरिक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांना इतर बाबींसह विचारात आणि पटलावर घेण्यासाठी सोमवार, ७ ऑगस्ट, २०१७ रोजीस आयोजित करण्यात आली आहे.

वित्तीय निष्कर्ष हे कंपनीचे संकेतस्थळ www.tatasteel.com तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे संकेतस्थळ www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडचे संकेतस्थळ www.bseindia.com यावर उपलब्ध करून देण्यात येतील.

**टाटा स्टील लिमिटेड**
सही/-
पार्वथीसम के
कंपनी सचिव

जुलै 27, 2017
मुंबई

**TATA STEEL**